# 30. जिल्हा निवड समिती हिंगोली
# तलाठी भरती लेखी परीक्षा-२०१४

प्र.१. 'लक्ष्मीनारायण' या शब्दात किती व्यंजने आहेत?
(१) सहा (२) सात (३) आठ (४) नऊ

प्र.२. खालील तीन संधी एका नियमानुसार झाले आहेत. एक संधी वेगळ्या नियमानुसार झाला आहे, तो संधी ओळखा.
(१) मतैक्य (२) क्षणैक (३) सदैव (४) नाहीसा

प्र.३. योग्य समासाचा पर्याय ओळखा: त्रिखंड
(१) द्वंद्व (२) कर्मधारय (३) द्विगू (४) अव्ययीभाव

प्र.४. भाववाचकनाम नसलेला शब्द कोणता?
(१) गोडी (२) गोडवा (३) गोड (४) माधुर्य

प्र.५. पुढील वाक्यातील काळ ओळखा : आम्ही सिनेमा पाहत आहोत.
(१) पूर्ण वर्तमानकाळ (२) अपूर्ण वर्तमानकाळ
(३) अपूर्ण भूतकाळ (४) अपूर्ण भविष्यकाळ

प्र.६. पुल्लिंगी शब्द ओळखा.
(१) पान (२) फूल (३) फांदी (४) गर

प्र.७. स्त्रीलिंगी शब्द ओळखा.
(१) साग (२) आग (३) राग (४) डाग

प्र.८. नपुसकलिंगी शब्द ओळखा.
(१) धडा (२) पुस्तक (३) कविता (४) लेखक

प्र.९. खालीलपैकी उभयवचनी शब्द कोणता?
(१) देश (२) राष्ट्र (३) राज्य (४) जिल्हा

प्र.१०. पुढील प्रश्नातील विभक्ती त्यापुढे दिलेल्या नामांपैकी ज्या नामाला लागू पडते, त्याचा पर्याय ओळखा. चतुर्थी
(१) घोड्याला (२) घोड्याने (३) घोड्याचा (४) घोड्यात

प्र.११. खालीलपैकी सकर्मक कर्तरी प्रयोग ओळखा.
(१) अनिरुद्ध पेपरास सोडवतो. (२) अनिरुद्धने पेपर सोडवला.
(३) अनिरुद्धने पेपरास सोडवले. (४) अनिरुद्ध पेपर सोडवतो.

प्र.१२. प्रयोग ओळखा. 'घारी आकाशांत ऊंच ऊंच भराऱ्या घेतात.'

(१) अकर्मक कर्तरी प्रयोग (२) सकर्मक कर्तरी प्रयोग

(३) कर्मणी प्रयोग (४) भावे प्रयोग

प्र.१३. 'एकतर मी सहलीला जाईन, नाहीतर घरी राहीन.' या वाक्याचा प्रकार कोणता?

(१) मिश्र (२) संयुक्त (३) स्वार्थी (४) आज्ञार्थी

प्र.१४. शुद्ध शब्दाचा पर्याय ओळखा.

(१) जीज्ञासू (२) जीज्ञासु (३) जिज्ञासू (४) जिज्ञासु

प्र.१५. अशुद्ध शब्द ओळखा.

(१) व्यर्ग (२) भ्रष्ट (३) स्वर्ग (४) मार्ग

प्र.१६. समानार्थी शब्दाचा पर्याय ओळखा : तडाग

(१) ताट (२) तलाव (३) जहाज (४) तडा

प्र.१७. वाक्प्रचाराचा योग्य अर्थाचा पर्याय ओळखा. साखर पेरणे

(१) मुंग्याना साखर घालणे (२) उसाची शेती करणे

(३) गोड बोलणे (४) गुंगून जाणे

प्र.१८. 'रभा लाईभु ळका लायखा' यामध्ये कोणती म्हण दडली आहे?

(१) खाई त्याला खवखवणे (२) खोट्याच्या कपाळी गोटा

(३) खायला काळ भुईला भार (४) कोल्हा काकडीला राजी

प्र.१९. चुकीची जोडी कोणती?

(१) शाश्वत - कायम टिकणारे (२) रामबाण - अचूक गुणकारी

(३) वरमाय - नवरदेवाची आई (४) कलाप्रेमी - कलेमध्ये कुशल

प्र.२०. 'त्रिशंकू' या अलंकारिक शब्दाचा अचूक अर्थ कोणता?

(१) तीन कोनांचा समूह (२) ना धड इकडे, ना धड तिकडे

(३) तिन्ही ठिकाणी असणे (४) त्रिकोणी आकाराचा शंकू

प्र.२१. 'र स्त्र ह श्मी स' या अक्षरापासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दाचा खालीलपैकी अर्थ ओळखा.

(१) नदी (२) डोंगर (३) सूर्य (४) चंद्र

प्र.२२. ग्रंथ लिहिणाऱ्या लेखकाचा योग्य पर्याय ओळखा. 'केकावली'

(१) वामन पंडित (२) कुसुमाग्रज (३) मोरोपंत (४) संत रामदास

प्र.२३. श्री. दिवाकर हे साहित्यिक कोणत्या साहित्य प्रकाराबद्दल प्रसिद्ध आहेत?

(१) नाटककार (२) कथाकार (३) नाट्यछटाकार (४) कादंबरीकार

प्र.२४. चुकीच्या जोडीचा पर्याय ओळखा.

(१) तराळ-अंतराळ - शंकरराव खरात (२) माझी जन्मठेप - महात्मा गांधी

(३) कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण (४) एक झाड दोन पक्षी - विश्राम बेडेकर

**प्र.२५. इंद्रधनुष्यातील क्रमवार पाचवा रंग कोणता?**

(१) पिवळा (२) हिरवा (३) निळा (४) जांभळा

**प्र.२६. खालीलपैकी कोणते उद्दिष्ट पंचायतराज संकल्पनेत मोडत नाही?**

(१) लोकशाहीचे शिक्षण. (२) लोकांचा प्रशसनात सहभाग.

(३) सत्तेचे विकेंद्रीकरण. (४) प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ.

**प्र.२७. 'फ्रीडम ॲट मिडनाईट' या सुप्रसिद्ध पुस्तकाचे लेखक......**

(१) कुलदीप नय्यर (२) मुल्कराज आनंद (३) चार्ल्स डिकन्स (४) लॅपिरे कॉलिन्स

**प्र.२८. ज्यांच्या नावाने 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' दिला जातो, ते रॅमन मॅगसेसे...... या देशाचे अध्यक्ष होते.**

(१) मॉरिशस (२) नामिबिया (३) झांबिया (४) फिलिपाईन्स

**प्र.२९. 'बेथलहेम' हे स्थळ कोणत्या एका घटनेमुळे जगप्रसिद्ध झाले आहे?**

(१) तेथे येशू ख्रिस्ताला सुळावर चढवले. (२) तेथे ख्रिस्ताने पहिला उपदेश केला.

(३) तेथे येशू ख्रिस्ताचा जन्म झाला. (४) तेथे येशू ख्रिस्त पुन्हा प्रगटला.

**प्र.३०. 'दूधगंगा' हा कोल्हापूर जिल्ह्यातील प्रकल्प...... या राज्याच्या सहकार्याने उभारला गेला आहे.**

(१) गुजरात (२) आंध्र प्रदेश (३) कर्नाटक (४) गोवा

**प्र.३१. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?**

(१) दर दोन वर्षांनी राज्यसभेतील एकतृतीयांश सभासद निवृत्त होतात.

(२) राज्यसभेचे सभासद हे कायमचे सभासद असतात.

(३) राज्यसभेची मुदत पाच वर्ष इतकी असते.

(४) दर पाच वर्षांनी राज्यसभेवर नवीन सदस्य निवडून दिले जातात.

**प्र.३२. एक मीटर म्हणजे...... च्या अणुतून उत्सर्जित झालेल्या नारिंगी-लाल रंगाच्या प्रकाशाची तरंग लांबी होय.**

(१) सिसियम-३३ (२) क्रिप्टॉन-८६ (३) रेडियम-३३ (४) युरेनियम-२२

**प्र.३३. Veni, vidi, vici (I came, I saw, I conquered) शेक्सपिअरचे सुप्रसिद्ध वाक्य त्याच्या...... या साहित्यकृतीतील आहे.**

(१) हॅम्लेट (२) ऑथेल्लो (३) ॲज यू लाईक इट (४) ज्युलियस सीझर

**प्र.३४. करडईत तेलाचे प्रमाण ३१ टक्के इतके असते, तर सूर्यफुलात ...... टक्के इतके असते.**

(१) ४४ (२) २९ (३) ५१ (४) २१

**प्र.३५. Robber Economy ही संज्ञा खालीलपैकी कोणत्या संदर्भात प्रचलित आहे?**

(१) भ्रष्टाचार (२) मिश्रशेती (३) वनशेती (४) मत्स्यव्यवसाय

**प्र.३६. महाराष्ट्र शासनाने विकासाच्या प्रादेशिक असमतोलासंदर्भात नेमलेल्या सत्यशोधक समितीचे (Fact Finding Committee) चे अध्यक्ष कोण होते?**

(१) सुशीलकुमार शिंदे (२) डॉ. मधुसुदन साठे

(३) डॉ. एम. जी. बोकरे (४) डॉ. व्ही. एम. दांडेकर

**प्र.३७. भारतात...... या वर्षी ग्राहक संरक्षण कायदा संमत केला गेला.**

(१) १९६९ (२) १९७७ (३) १९८६ (४) १९९२

**प्र.३८. एक रुपयाच्या नोटाव्यतिरिक्त अन्य चलनी नोटांवर...... यांची स्वाक्षरी आहे.**

(१) गव्हर्नर, रिझर्व्ह बँक (२) केंद्रीय अर्थमंत्री

(३) सचिव, अर्थ आयोग (४) पंतप्रधान

**प्र.३९. कृषी अभियांत्रिकी केंद्रीय संस्था (Central Institute of Agriculture Engineering) ही खालीलपैकी कोठे आहे?**

(१) भोपाळ (२) नागपूर (३) सिमला (४) कोलकाता

**प्र.४०. ...... ही नदी दक्षिण गंगा तसेच वृद्धगंगा म्हणून ओळखली जाते.**

(१) बीड (२) वारण (३) गोदावरी (४) कृष्णा

**प्र.४१. 'कयाधू' या नदीचा उल्लेख...... या जिल्ह्यातील प्रमुख नदी असा करावा लागेल.**

(१) बीड (२) गोंदिया (३) वाशिम (४) हिंगोली

**प्र.४२. सौरशक्ती आणि ऊर्जाशक्ती या संदर्भात अग्रेसर असलेले महाराष्ट्रातील ठिकाण......**

(१) नाशिक (२) चंद्रपूर (३) पुणे (४) औरंगाबाद

**प्र.४३. महाराष्ट्रातील अतिपूर्वेकडील जिल्हे ......**

(१) भंडारा, चंद्रपूर (२) नागपूर, अमरावती

(३) अकोला, वाशिम (४) गडचिरोली, गोंदिया

**प्र.४४. रायगड जिल्ह्याचे पूर्वीचे नाव......**

(१) सिंधुदुर्ग (२) कुलाबा (३) अलिबाग (४) जंजिरा

**प्र.४५. 'उमराण व मेहरूण' या जातीच्या बोरासाठी खालीलपैकी कोणता जिल्हा प्रसिद्ध आहे?**

(१) सांगली (२) गडचिरोली (३) सिंधुदुर्ग (४) जळगाव

**प्र.४६. पुढील नद्या त्यांच्या महाराष्ट्रातील लांबीनुसार चढत्या क्रमाने लावा.**
**भीमा, गोदावरी, नर्मदा, कृष्णा**

(१) भीमा, गोदावरी, नर्मदा, कृष्णा (२) गोदावरी, नर्मदा, कृष्णा, भीमा

(३) नर्मदा, कृष्णा, भीमा, गोदावरी (४) कृष्णा, भीमा, गोदावरी, नर्मदा

**प्र.४७. बडोदाधिपती सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या कार्याच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?**

(१) त्यांनी राज्यातील पंचायतीचे पुनरुज्जीवन घडवून आणले.

(२) पडदापद्धती बंदी, बालविवाह बंदी, कन्याविक्रय बंदी आदी सुधारणा घडवून त्या अंमलात आणल्या.

(३) औद्योगिक, कला शिक्षणासाठी बडोदा येथे कलाभूवन सुरू केले.

(४) इ.स.१९४२ च्या चळवळीत संस्थानातील प्रजेचे नेतृत्व केले.

**प्र.४८. महर्षी धों. के. कर्वे यांच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे ठरेल?**

(१) विधवा विवाहांना चालना मिळावी म्हणून इ.स. १८९३ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळी नावाची संस्था स्थापन केली.

(२) उक्तीप्रमाणे कृती या न्यायाने स्वत: एका विधवेशी विवाह करून आदर्श घालून दिला.

(३) इ.स. १९१६ मध्ये स्त्रियांसाठी स्वतंत्र अशा महिला विद्यापीठाची स्थापना केली. तेच पुढे एस.एन.डी.टी विद्यापीठ म्हणून प्रसिद्धीस आले.

(४) कुटुंब नियोजनाची आवश्यकता व महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी कुटुंब नियोजनाचा प्रचार, प्रसार केला.

**प्र.४९. जिवाणूभक्षी (Bacteriophage) सजीवामध्ये ...... न्यूक्लिक आम्ल आढळून येते.**

(१) आरएनए (२) डीएनए

(३) डीएनए व आरएनए (४) वरीलपैकी एकही नाही.

**प्र.५०. खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे?**

(१) स्वातंत्र्यवीर सावरकर – जोसेफ मॅझिनीचे चरित्र

(२) आचार्य कृपलानी – दी इंडियन स्ट्रगल

(३) जवाहरलाल नेहरू – ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री

(४) डॉ. राजेंद्रप्रसाद – दी साँग ऑफ इंडिया

**प्र.५१. RECRUITMENT हा शब्द जर MENTTIUCER असा लिहिला, तर EXAMINATION शब्द कसा लिहावा?**

(१) EAIXMNOITAN (२) NOITANIMAXE

(३) TIONANIMAXE (४) MINATIONEXA

**प्र.५२. TELEVISION चे रूपांतर 1-2-3-4-5-6-7-8 मध्ये केले, तर ४–५–६–५–१ हे कसले रूपांतर आहे?**

(१) VISIT (२) VISION (३) LESION (४) LOTION

**प्र.५३. खालील पर्यायांमधून जुळणारी संख्या शोधा.**

| | | |
|---|---|---|
| २१ | ३३ | ५४ |
| ६६ | १९ | ४२ |
| ९८ | ? | २६ |

(१) ५२ (२) ७२ (३) ८१ (४) ८५

**प्र.५४. रिक्त चौकोन पूर्ण करा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **2** | **4** | **12** | **48** | **240** | **1440** | |

(१) 6348 (२) 10275 (३) 9042 (४) 10080

**प्र.५५. योग्य तो पर्याय निवडा: VW,QR,LM,GH……**

(१) BC (२) AB (३) CB (४) BA

**प्र.५६. जर एखाद्या नकाशात पश्चिम दिशा अग्नेय दिशेच्या स्थानी आली, तर त्या नकाशात नैर्ऋत्य दिशा कोणत्या दिशेच्या स्थानी येईल?**

(१) उत्तर (२) ईशान्य (३) दक्षिण (४) पूर्व

**प्र.५७. A खेड्यातील १८ हजार लोकांपैकी ०.२५% व्यक्तींकडे संगणक आहे, B खेड्यातील १९ हजार व्यक्तीपैकी ०.३०% व्यक्तीकडे संगणक आह, तर कोणत्या खेड्यात जास्त संगणक आहेत?**

(१) A खेडे

(२) B खेडे

(३) दोन्ही खेड्यात समान संख्येने संगणक आहेत

(४) निष्कर्षासाठी दिलेली माहिती अपुरी आहे.

**प्र.५८. मेंढ्या आणि मेंढपाळांच्या एका गटामध्ये एकूण पायांची संख्या ही डोक्यांच्या संख्येच्या दुपटीपेक्षा १६ ने अधिक आहे, तर गटात मेंढ्यांची संख्या किती?**

(१) ६ (२) ८ (३) २२ (४) ३५

**प्र.५९. मालिका पूर्ण करा : ३६, ७६, १११,?**

(१) १२१ (२) १३३ (३) १४४ (४) १५१

**प्र.६०. दिलेल्या संख्यासमूहाशी साम्य असलेला समूह पर्यायातून निवडा : २१, ३१, ५१**

(१) ११, २१, ४१ (२) ७, १७, २७ (३) ११, १३, ११९ (४) ७, ९, ११

**प्र.६१. सतीशचे पंधरा वर्षांपूर्वी वय तीस होते, तर तो किती वर्षांनी साठ वर्षांचा होईल?**

(१) १० (२) १५ (३) २५ (४) ३०

**प्र.६२. अ स्त्री ब स्त्रीस म्हणाली, 'तू माझ्या सुनेची मुलगी आहेस,' तर अ ही ब ची कोण?**

(१) आजी (२) आई (३) मुलगी (४) बहीण

**प्र.६३. प्रश्नचिन्हांच्या जागी योग्य पर्याय ओळखा. १७ : ३७ :: ६५ :?**

(१) ९५ (२) १०४ (३) १०१ (४) १००

**प्र.६४. खालील शब्दातील कोणता शब्द प्रश्नचिन्हाच्या जागी ठेवाल?**
**पोपट : पिंजरा :: मनुष्य :?**

(१) घर (२) जंगल (३) तुरुंग (४) इमारत

**प्र.६५. पुढील दोन विधाने दिली आहेत यावरून कोणता निष्कर्ष सत्य आहे?**
**विधान : (१) काही मांजरे काळी आहेत. (२) सर्व कावळे काळे आहेत.**
**विधान : (१) काही मांजरे काळी नाहीत. (२) काही कावळे काळे आहेत.**

(१) (१) सत्य (२) (२) सत्य

(३) (१) व (२) सत्य (४) (१) व (२) असत्य

प्र.६६. पुढील जोड्यांमधील विसंगती ओळखा.

(१) १९-२१ (२) ३९-४५ (३) २६-२८ (४) ५१-५७

प्र.६७. पुढील मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल? : ३, १०,२९, ६६, १२७?

(१) २४८ (२) २३६ (३) २१८ (४) २५८

प्र.६८. पुढील मालिकेत रिकाम्या जागी अन्य अक्षरे भरा. xy, y, xyxx, xyyx, x

(१) xyxy (२) yxxy (३) xxxy (४) xyyy

प्र.६९. पुढील दिलेल्या ४ शब्दांपैकी कोणता शब्द इतर तीनहून वेगळा आहे? संगणक, गणकयंत्र, मोजणी, स्लाईडरूल

(१) संगणक (२) गणकयंत्र (३) मोजणी (४) स्लाईडरूल

प्र.७०. वनस्पती व कार्बन डायऑक्साईड यांचा जसा संबंध आहे, तसा पशू यांचा संबंध कोणाशी आहे?

(१) हवा (२) पशुखाद्य (३) ऑक्सिजन (४) नायट्रोजन

प्र.७१. वैद्य : औषधोपचार :: न्यायाधीश : ?

(१) शिक्षा (२) तडजोड (३) न्याय (४) दंड

प्र.७२. हत्तीला आपण कुत्रा व कुत्र्याला सिंह म्हणूया, उंदराला हरिण, बैलाला उंदीर आणि मांजराला हत्ती मानूया. या सर्व प्राण्यांची आकारमानाप्रमाणे मांडणी केल्यास मध्यभागी कोणता प्राणी येईल?

(१) कुत्रा (२) हत्ती (३) सिंह (४) हरिण

प्र.७३. 'ब' ची आई ही 'अ' च्या आईची सासू आहे, तर 'ब' चे 'अ' च्या आईशी खालीलपैकी काय नाते असू शकते?

(१) सासरा-सून (२) दीर-भावजय (३) भाऊ-बहीण (४) चुलता-पुतणी

प्र.७४. रामरावांचे वय गणपतरावांच्या वयाच्या $\frac{१}{५}$ आहे, दोघांच्या वयाची बेरीज ७२ इतकी आहे, तर गणपतरावांचे वय किती?

(१) ३२ (२) ४० (३) ४५ (४) ४६

प्र.७५. A ला जसे Z तसे F ला काय?

(१) B (२) P (३) T (४) U

**Choose the word that is opposite in meaning to the word given.**

प्र.७६. **Defiant -**

(१) Obedient (२) Opponent (३) Arrogant (४) Humble

प्र.७७. **Brutal -**

(१) Quiet (२) Humane (३) Soft (४) Humble

प्र.७८. **Optimistic -**

(१) Permanent (२) Downstair (३) Perennial (४) Pessimistic

प्र.७९. **Select the correct direct speech from the following.**

(१) I don't tell myself I am a hero, says Kapil Dev.

(२) Kapil Dev told I am a Hero.

(३) Kapil Dev says that he doesent tell himself that he is a hero.

(४) Ram is as clever as other boys in the class.

प्र.८०. **Find the sentence which is in superlative degree.**

(१) Very few boys in the class is as clever as Ram

(२) Ram is one of the cleverest boys in the class.

(३) Ram is cleverer than most other boys in the class

(४) Ram is a clever as other boys in the class.

**One word substitutes-**

प्र.८१. **Able to live on land and sea.**

(१) Abeyance (२) Alienate (३) Amphibious (४) Accessible

प्र.८२. **Science of mankind**

(१) Anthropology (२) Aesthetics

(३) Aquarium (४) Biologist

प्र.८३. **State of having one wife, husband.**

(१) Monotonous (२) Monotheism (३) Mercenary (४) Monogamy

प्र.८४. **Excessive use of the rules and regulations.**

(१) Red tapism (२) Regulatory (३) Plutocracy (४) Regime

प्र.८५. **Apple of ones eye.**

(१) One apple in the eye (२) Money earned

(३) Very dear (४) Causes of quarrel

प्र.८६. **Break the ice.**

(१) Formation of ice (२) Born in rich family

(३) To relieve shyness (४) To reprimand someone

प्र.८७. **Put ones foot down.**

(१) To be very firm about ones action or opinion

(२) To pull foots of someone

(३) Kicked by foot (४) To praise oneself

प्र.८८. **Ins and outs.**

(१) Inside and outside (२) In the room

(३) To have complete knowiedge (४) Just manage in and out

**Choose correct reflexive pronoun for the blank space.**

प्र.८९. **She blamed......**

(१) ourselves (२) themselves (३) theirselves (४) himselves

प्र.९०. **Choose indefinite pronoun......**

(१) he (२) they (३) someone (४) myself

प्र.९१. **We...... came out of the jungle.**

(१) ourselves (२) ourself (३) himself (४) he

**Each of the following sentence is divided in to four parts A, B, C, D . Find out the part which has an error. (92 to 94)**

प्र.९२. **I am / superior than/ are / very fascinating.**

(१) A (२) B (३) C (४) D

प्र.९३. **The scenery / of Kashmir / are / very fascinating.**

(१) C (२) B (३) A (४) D

प्र.९४. **I / have been ill / from / yesteray.**

(१) D (२) B (३) A (४) C

प्र.९५. **Affliction - Synonyms to the word given below.**

(१) Distress (२) Anger (३) Violation (४) Loving

प्र.९६. **Anxiety-**

(१) Antique (२) Apprehension (३) Worship (४) Amiable

प्र.९७. **Malady-**

(१) Disease (२) Maximum (३) Mature (४) Marginal

प्र.९८. **Good advice......not always needed.**

(१) was (२) has (३) is (४) had

प्र.९९. **As soon as he heard the news......**

(१) he had written to me (२) he wrote to me

(३) he will write to me (४) None of these

प्र.१००. **When it...... dark, we shall stop.**

(१) got (२) getting (३) well got (४) gets

## प्रश्नपत्रिका संग्रह – ३० (लेखी परीक्षा उत्तरसूची) हिंगोली

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (३) | २ (४) | ३ (३) | ४ (३) | ५ (२) | ६ (४) | ७ (२) | ८ (२) | ९ (१) | १० (१) |
| ११ (४) | १२ (२) | १३ (१) | १४ (३) | १५ (१) | १६ (२) | १७ (३) | १८ (३) | १९ (४) | २० (२) |
| २१ (३) | २२ (३) | २३ (३) | २४ (२) | २५ (३) | २६ (४) | २७ (४) | २८ (४) | २९ (३) | ३० (३) |
| ३१ (१) | ३२ (२) | ३३ (४) | ३४ (१) | ३५ (४) | ३६ (४) | ३७ (३) | ३८ (१) | ३९ (१) | ४० (३) |
| ४१ (४) | ४२ (४) | ४३ (४) | ४४ (२) | ४५ (४) | ४६ (३) | ४७ (४) | ४८ (४) | ४९ (२) | ५० (४) |
| ५१ (२) | ५२ (१) | ५३ (३) | ५४ (४) | ५५ (१) | ५६ (४) | ५७ (२) | ५८ (४) | ५९ (३) | ६० (४) |
| ६१ (२) | ६२ (१) | ६३ (३) | ६४ (३) | ६५ (१) | ६६ (३) | ६७ (३) | ६८ (४) | ६९ (३) | ७० (२) |
| ७१ (३) | ७२ (३) | ७३ (२) | ७४ (२) | ७५ (४) | ७६ (१) | ७७ (२) | ७८ (४) | ७९ (१) | ८० (२) |
| ८१ (३) | ८२ (१) | ८३ (४) | ८४ (१) | ८५ (३) | ८६ (३) | ८७ (१) | ८८ (३) | ८९ (४) | ९० (३) |
| ९१ (१) | ९२ (३) | ९३ (१) | ९४ (४) | ९५ (१) | ९६ (२) | ९७ (१) | ९८ (३) | ९९ (२) | १०० (४) |